MHBU040011572022

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | १२/०९/२०२२. |
| नोंदणी दिनांक | १२/०९/२०२२. |
| निकाल दिनांक | ०६/०५/२०२६ |
| कालावधी | वर्ष – महिने –दिवस<br>०३ ०७ २४ |

**निशाणी क्र.६२**

**नमुना क्र. XXXII**

**भाग 'अ'**

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(i)]**

<table>
<tr><td colspan="2">अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९, नुसार असलेल्या खामगांव, जिल्हा बुलडाणा येथील विशेष न्यायालयात<br>पीठासीन अधिकारी :– ग.भी. जाधव, विशेष न्यायाधीश</td></tr>
<tr><td></td><td>न्यायनिर्णयाची तारीख :– ०६/०५/२०२६.<br>विशेष खटला क्र. ७७/२०२२.</td></tr>
<tr><td></td><td>प्रथम खबर/गुन्हा क्र. १९६/२०२२.<br>पिंपळगांव राजा पोलीस स्टेशन.</td></tr>
<tr><td>फिर्यादी/<br>अभियोग पक्ष</td><td>महाराष्ट्र सरकार<br>तर्फे पिंपळगांव पोलीस स्टेशन.</td></tr>
<tr><td>प्रतिनिधीत्व करणार</td><td>विशेष सरकारी अभियोक्ता श्री.एस.बी.इंगळे</td></tr>
<tr><td>आरोपी</td><td>१) मंगेश अनिल माळी,<br>वय – २३ वर्ष, व्यवसाय – सलुन,<br>२) दुर्गेश अनिल माळी,<br>वय – २५ वर्ष, व्यवसाय – सलुन,<br>३) गणेश अनिल माळी,<br>वय – २६ वर्ष, व्यवसाय – सलुन,</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | **४) आकाश गोपाळ माळी,**<br>वय – २२ वर्ष, व्यवसाय – सलुन,<br>सर्व रा. कुंबेफळ, तालुका खामगांव, जिल्हा बुलढाणा. |
| प्रतिनिधीत्व करणार | विधीज्ञ श्री.एस.डी.गावंडे. |

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii )]**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २१/०७/२०२२ |
| प्रथम खबर तारीख | २३/०७/२०२२ |
| आरोपपत्र दाखल केल्याची तारीख | १२/०९/२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०४/०४/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख. | १६/१०/२०२५ |
| ज्या दिवशी न्यायनिर्णय राखून ठेवला आहे, ती तारीख | ०६/०५/२०२६. |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०६/०५/२०२६. |
| शिक्षा दिली असल्यास शिक्षेची तारीख | लागू नाही. |

**आरोपीची माहिती**

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | मंगेश अनिल माळी,<br>दुर्गेश अनिल माळी,<br>गणेश | दिनांक २७/०७/२०२२ | दिनांक २७/१२/२०२२ रोजी | भा.दं.वि. कलम ३२६, ३२३, ३२४ आणि ५०६ आणि अ.जा. अ.ज. (अ.प्र.) कायदा, १९८९ चे कलम ३(१)(r)(s) आणि कलम ३(२) | निर्दोष. | लागू नाही. | लागू नाही. |

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हे दाखल | निर्दोष ठरविले की दोषी ठरविले | ठोठाविलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४. | अनिल माळी, आकाश गोपाळ माळी, | | | (va) अन्वये. | | | |

**भाग 'ब'**

[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(iii)]

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| PW-1 | विजय सखाराम सावरकर (निशाणी क्र. ४२). | पंच साक्षीदार. |
| PW-2 | संतोष निनाजी इंगळे (निशाणी क्र. ४७) | फिर्याद |
| PW-3 | राहूल निनाजी इंगळे (निशाणी क्र. ४८) | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | कोणी नाही. | -- |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाची निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | ४९ | घटनास्थळ पंचनामा (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |
| २. | ५० | सि.टी.स्कॅन रिपोर्ट (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |
| ३. | ५१ | द्वारका हॉस्पीटल अॅडव्हाईस (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |
| ४. | ५२ | कन्टीन्युएशन सिट ऑफ फॉर्म (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |
| ५. | ५३ | जखमांचे प्रमाणपत्र (आरोपीतर्फे कबूल करण्यात आले) |
| ६. | ५४ | जातीचे प्रमाणपत्र (आरोपीतर्फे कबूल करण्यात आले) |
| ७. | ५५ | शाळा सोडल्याचा दाखला (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |
| ८. | ५६ | प्रवेश निर्गम उतारा (आरोपीतर्फे कबूल करण्यात आला) |

ब. बचाव पक्षातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | –– | –– |

क. न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| | –– | –– |

ड. भौतिक वस्तू (Material Objects)

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | तपशिल |
| --- | --- | --- |
| | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०६ मे, २०२६ रोजी पारित)

आरोपी हे भारतीय दंड विधान, १८६० (यापुढे भा.दं.वि. असे संबोधले आहे.) चे कलम ३२६, ३२३, ३२४ आणि ५०६ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९, चे कलम ३(१)(r) (s) आणि ३(२)(va) नुसार शिक्षापात्र गुन्ह्याच्या संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**२.** फिर्यादी संतोष निनाजी इंगळे जात बौध्द यांनी दिनांक २३/०७/२०२२ रोजी पोलीस स्टेशन पिंपळगांव राजा येथे तोंडी रिपोर्ट दिला की, दिनांक २१.०७.२०२२ रोजी संध्याकाळी ६.३० वाजताचे दरम्यान ते दाढी–कटींग करण्यासाठी गावातील मंगेश अनिल माळी जात न्हावी याचे दुर्गेश हेअर सलून नावाचे दुकानात गेले असता ते तेथे तासभर बसले व त्यानंतर त्यांनी आरोपीस म्हटले की, त्याचा दाढी करण्याचा नंबर आहे, त्याची दाढी कटींग करुन दे. त्यावेळी आरोपी मंगेश याने फिर्यादीस म्हटले की, मी तुझी दाढी करुन देत नाही असे म्हणून त्याला म्हणाला की, “तुला काय करायचे थेडग्याहो तुम्ही जास्त माजले" अशी शिवीगाळ केली व त्यावेळी त्याचे इतर भाऊ म्हणजे इतर आरोपी तेथे येऊन त्यांनी जातीवाचक शिवीगाळ केली. आता जर घरी गेला नाही तर बजरंग दलाचे मुले आणून सर्व घराला मारठोक करु असे म्हणून आरोपी मंगेश याने हातात रॉड घेऊन फिर्यादीचे डोक्यात मारला, त्यामुळे त्याचे डोक्याला जखम झाली. तसेच तेथे हजर असलेला आरोपी आकाश गोपाल माळी याने त्याचे जवळ

असलेल्या फाइटरने छातीत बुक्के मारले. तसेच आरोपी दुर्गेश अनिल माळी व गणेश अनिल माळी यांनी फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यामुळे तो खाली पडला. त्यानंतर आरोपी मंगेश माळी याने त्याचे मोबाईलवरुन फिर्यादीचा मुलगा विश्वजीत इंगळे याला फोन करुन सांगितले की, त्याचे वडीलांना त्याने मारहाण केली, म्हणून फिर्यादीच्या मुलाने फिर्यादीचा भाऊ राहूलला फोन करुन घटनेबाबत सांगून वडीलांना दवाखान्यात घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे फिर्यादीचा भाऊ याने फिर्यादीला कुलदीप डोबाळे यांच्या ऑटोत टाकून खामगांव येथील दवाखान्यात भरती करण्यात आले. दवाखान्यातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर फिर्यादी यांनी पोलीस स्टेशन पिंपळगांव राजा येथे घटनेचा तोंडी रिपोर्ट दिला.

३. सदर रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन पिंपळगांव येथे गुन्हा क्र. १९६/२०२२ भा.दं.वि. चे कलम कलम ३२६, ३२४, ३२३ आणि ५०६ आणि अ.जा. आणि अ.ज. (अ.प्र.) कायदा, १९८९, चे कलम ३(१)(r) (s) आणि ३(२)(va) नुसार दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४. आरोपींविरुध्द भारतीय दंड संहीतेचे कलम ३२६, ३२३, ३२४ आणि ५०६ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९, चे कलम ३(१)(r) (s) आणि ३(२)(va) अन्वये दोषारोप निशाणी क्र.३५ वर निश्चित केला. सदरचा दोषारोप आरोपींना मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबूल केला व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. आरोपी विरुध्दचा गुन्हा सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने एकूण तीन साक्षीदार तपासले आहेत. आरोपी विरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा न

आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे अन्वये आरोपींचे जबाब नोंदविण्यात आले नाहीत.

**६.** खटल्यातील तथ्य पाहता, माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांच्या आधारे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, दिनांक २१/०७/२०२२ रोजी सायंकाळी ६.३० वाजता कुंबेफळ येथील आरोपी मंगेश माळी यांच्या सलुनमध्ये फिर्यादी संतोष निनाजी इंगळे हा दाढी करण्यासाठी आला असतांना तुम्ही सर्व आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसरणार्थ लोखंडी पाईपने त्याच्या डोक्यावर मारुन ईच्छापुर्वक जबर दुखापत पोहोचवली ? | ... नाही. |
| २ | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमूद केलेल्या तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही सर्व आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसरनार्थ फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत पोचवली ? | ... नाही. |
| 3. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, तुम्ही सर्व आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसरनार्थ आणि आरोपी आकाश गोपाळ माळी याने फिर्यादीस लोखंडी फाईटरने त्याचे पोटात व छातीवर मारुन त्याला इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली? | ... नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, सर्व | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | आरोपींनी समान उद्देशाच्या पुरसरनार्थ फिर्यादीस तो घरी गेला नाही तर बजरंग दलाचे पोरं आणून सर्व घराला मारठोक करु अशी धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा केला ? | ... नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, सर्व आरोपींनी तुम्ही अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे सदस्य नसतांना जाणूनबुजून फिर्यादी हे अनुसूचित जातीचे सदस्य असतांना त्यांना “तुम्ही धेडगे जास्त माजले आणि धेडगे जास्त माजले यांना दाखवा लागते असे म्हणून धमकी देऊन सार्वजनिक ठिकाणी त्यांना शिवीगाळ केली व त्यांचा अपमान केला ? | ... नाही. |
| ६. | अभियोग पक्षाने सिध्द केले काय की, वर नमूद केलेल्या तारखेला, वेळी आणि ठिकाणी, सर्व आरोपींनी तुम्ही अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे सदस्य नसतांना जाणूनबुजून फिर्यादी हे अनुसूचित जातीचे सदस्य असतांना देखील भारतीय दंड विधान मधील गुन्हा केला ? | ... नाही. |
| ७. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र. १ ते ६ बाबत :–**

७. अभिलेख पडताळले. अभियोग पक्षातर्फे विद्वान विशेष सरकारी अभियोक्ता श्री.एस.बी.इंगळे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस.डी.गावंडे यांचा

युक्तीवाद ऐकला.

८. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ संतोष निनाजी इंगळे हे फिर्यादी तसेच साक्षीदार क्र.३ राहूल निनाजी इंगळे फिर्यादीचा भाऊ असे निशाणी ४७ व ४८ द्वारे तपासण्यात आले. या दोन्ही मुख्य साक्षीदारांनी ते सर्व आरोपींना ओळखतात व ते माळी जातीचे आहेत असे सांगितले. तसेच फिर्यादी हा बौध्द समाजाचा आहे असे सांगितले. परंतु त्याने घटनेबाबत काहीही सांगितलेले नाही. त्यामुळे सरकारी वकीलांनी न्यायालयाची परवानगी घेऊन त्यांना उलटतपासणीचे स्वरुपातील प्रश्न विचारले परंतु त्यांच्या ऊलटतपासणीतून सरकार पक्षास अनुकूल अशी कुठलीही बाब आलेली नाही. पर्यायाने तोंडी रिपोर्ट व प्रथम खबर अहवाल सिध्द झालेले नाहीत.

९. साक्षीदार क्र. १ विजय सखाराम सावरकर हे पंच साक्षीदार असून त्यांनी देखील अभियोग पक्षाच्या खटल्यास सहाय्य केलेले नाही. सरकारपक्षाने घेण्यात आलेल्या उलटतपासणीतून त्यास अनुकूल अशी कोणतीही बाब आलेली नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. १ ते ३ यांनी दिलेल्या पुराव्यावरुन अभियोग पक्षाच्या आरोपास पुष्टी मिळेल असा कोणताही पुरावा अभिलेखावर न आल्याने विशेष सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाचविण्यासाठी निशाणी क्र. ६१ वरील पुरसिस देवून अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

१०. वरील परिच्छेदांमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२६, ३२३, ३२४ आणि ५०६ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९, चे कलम ३(१)(r) (s) आणि ३(२)(va) नुसार दोषारोप सिध्द होण्यासाठी कोणताही

पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींची निर्दोष मुक्तता होण्यास ते पात्र ठरतात. म्हणून मी मुद्दे क्र. १ ते ६ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्र. ७ चे उत्तराकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी नामे मंगेश अनिल माळी, दुर्गेश अनिल माळी, गणेश अनिल माळी, आकाश गोपाळ माळी, यांची पोलीस स्टेशन पिंपळगांव राजा येथे नोंदविलेल्या गुन्हा क्र. १९६/२०२२ वरुन दाखल झालेल्या प्रस्तुत खटल्यातून भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२६, ३२३, ३२४ आणि ५०६ आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९, चे कलम ३(१)(r) (s) आणि ३(२)(va) अन्वये शिक्षा असलेल्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) मुद्देमाल मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

४) न्यायालयाच्या सदरच्या न्यायनिर्णयाविरुध्द अपील दाखल झाल्यास जेव्हा केव्हा माननीय उच्च न्यायालय नोटीस देईल, तेव्हा न्यायालयासमोर उपस्थित राहण्याकरीता आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहीतेच्या कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– प्रत्येकी चे बंधपत्रासह जमानतपत्र द्यावयाचे आहे. सदरच्या जमानतपत्राचा अंमल सहा महिन्यांकरीता राहील.

४) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला.

JADHAV GANESH BHIMRAO
Digitally signed by JADHAV GANESH BHIMRAO
Date: 2026.05.06 17:19:14 +0530

खामगांव.
दिनांक – ०६/०५/२०२६.

(**ग.भी. जाधव**)
विशेष न्यायाधीश
[अ.जा. अ.ज. (अ.प्र) कायदा],
खामगांव.